महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**विशेष पोलीस वार्तापत्र**

**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**

दिनांक ०१/११/२०२२

# देशी कटटा बाळगणारे दोन गुन्हेगारांवर स्थानिक गुन्हे शाखे ची कारवाई

यवतमाळ जिल्हयातील अवैध शस्त्र अग्नीशस्त्र वापरुन घडणाऱ्या गुन्हयांना प्रतिबंध घालण्यासाठी तसेच जिल्हयात कोठेही अवैध शस्त्र, अग्नीशस्त्रांचा वापर होवु नये याकरीता मा. पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी गांभीर्यपुर्वक दखल घेवुन अवैधशस्त्र बाळगणाऱ्यां गुन्हेगारांची गोपनिय माहिती काढण्याबाबत पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना आदेशीत केल्याने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडील पथकाना अवैध शस्त्रांसबधी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असतांना दिनांक ३१/१०/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार अउघड गुन्हयासंबधाने पुसद शहरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदाराने बातमी दिली की, ग्राम डोंगरगांव येथील रहिवासी असलेला **सय्यद मुसवीर सय्यद जमील** याने व त्याचा **पुसद येथील साथीदार नामे मजहर खान जफरउल्ला खान** यांनी ग्राम डोंगरगांव येथे एका कार्यक्रमाचे दरम्यान देशी कटटयातुन हवेत फायर केलेले आहेत अशा गोपनिय माहतीवरुन पुसद शहरातील मजहर खान जफरउल्ला खान यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने ग्राम डोंगरगांव येथे मीत्राच्या देशी कटटयातुन फायर केल्याची कबुली दिल्याने मजहर खान जफरउल्ला खान यास ताब्यात घेवुन ग्राम डोंगरगांव येथे पोहचुन सय्यद मुसवीर सय्यद जमील वय २९ रा. डोंगरगाव यास ताब्यात घेवुन आरोपीने दिलेल्या कबुली प्रमाणे आरोपीचे राहते घरातुन एक देशी बनावटीचा कटटा व दोन जिवंत राउंड असा एकुण २१,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पोलीस स्टेशन पोफाळी येथे अपराध क्रमांक २४६/२०२२ कलम ३/२५, ३५ आर्म ॲक्ट नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास सपोनि हाके ठाणेदार पो.स्टे. पोफाळी हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. खंडेराव धरणे, यांचे मार्गदर्शनात श्री.प्रदीप परदेशी पो.नि. स्थागुशा, श्री.दिनेशचंद्र शुक्ला पो.नि. पुसद शहर, सपोनि गणेश वनारे, सपोनि विवेक देशमुख पोउपनि सागर भारस्कर, पोहवा उल्हास कुरकुटे, किशोर झेंडेकर, सुधीर पिदुरकर, चापोहवा जितेंद्र चौधरी सर्व स्थागुशा तसेच पोउपनि राजु खांदवे, नापोशी जलाल शेख, चालक सुनिल ठोंबरे पो.स्टे. पुसद शहर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

01.11.

( प्रदिप परदेशी )
पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ

Scanned with OKEN Scanner